नि.फौ.ख.क्र. १००/२०२१
सरकार वि.मुकेश
नि.क्र.२७

साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–अनिल दशरथ शहारे,
वय:–३९ वर्ष, व्यवसाय–रोजमजुरी
राह.सिर्सी येथील शेतात, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. मी मुकेश लेंढे यांना ओळखत नाही. मी मुकेश लेंढे यांच्या विटभट्टीवर कामावर नव्हतो. मला घटनेबाबत काही माहिती नाही. असे काही झाले नव्हते की, मी लेंढे यांच्या ट्रॅक्टरवर बसुन रेती आणली व पोलिसांनी परवाना नसल्यामुळे चोरीची रेती असल्यामुळे सदरहू ट्रॅक्टर पकडला.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/०४/२०२१ रोजी मी लेंढे यांच्या विटभट्टीवर कामावर गेलो होतो व तेथून लेंढे हे मला ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये रेती भरण्यासाठी घेउन गेले होते आणि सदर ट्रॅक्टरमध्ये नांद नदीमधील रेती भरली व सदर रेती आम्ही आणत आतांना पोलिसांनी आम्हाला थांबविले व त्यावेळी सदर रेतीबाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले व त्यावेळी मला माहित पडले की, सदर आरोपी हा चोरटी रेतीचे वाहतुक करित आहे. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.एम.आर.धांडे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि१५/०९/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड